फलोद्यान

# कोरडवाहू फळबागेची अशी घ्या काळजी



**प्रा. दर्शना मोरे**
(मो.नं. ९६८९२१७७९०)
क.का. वाघ उद्यानविद्या महाविद्यालय, नाशिक







> वाढत्या तापमानात फळबागेमध्ये ओलावा टिकवून ठेवण्यासाठी बुंध्याभोवती सेंद्रिय पदार्थांचे (५ टन प्रतिहेक्टरी) आच्छादन करावे. आच्छादनामुळे मातीतील उपयुक्त जिवाणूंच्या, गांडुळांच्या संख्येत वाढ होऊन मृदारचनेत अनुकूल सुधारणा होते. तसेच जमिनीची पाणीधारणेची क्षमता वाढते. जमिनीतून होणाऱ्या बाष्पीभवनाचा वेग कमी होऊन ओलावा टिकून राहतो. आच्छादनामुळे मातीचे तापमानही नियंत्रित राहते. परिणामी सिंचनासाठी कमी पाणी लागते.

सद्यःस्थितीत कोरडवाहू फळपिकात जमिनीतील ओलावा टिकविण्यासाठी उपाययोजना कराव्यात कारण तापमानात वाढ होत आहे. वाढत्या तापमानात फळबागेमध्ये ओलावा टिकवून ठेवण्यासाठी बुंध्याभोवती सेंद्रिय पदार्थांचे (५ टन प्रतिहेक्टरी) आच्छादन करावे. आच्छादनामुळे मातीतील उपयुक्त जिवाणूंच्या, गांडुळांच्या संख्येत वाढ होऊन मृदारचनेत अनुकूल सुधारणा होते. तसेच जमिनीची पाणीधारणेची क्षमता वाढते. जमिनीतून होणाऱ्या बाष्पीभवनाचा वेग कमी होऊन ओलावा टिकून राहतो. आच्छादनामुळे मातीचे तापमानही नियंत्रित राहते. परिणामी सिंचनासाठी कमी पाणी लागते.

सिंचनासाठी ठिबक सिंचन पद्धतीचा अवलंब करावा.

बागेमध्ये व्ही ब्लेडने मशागत करून जमीन भुसभुशीत ठेवावी. त्यामुळे तापमानवाढीमुळे जमिनीत पडणाऱ्या भेगा बुजल्या जातात. परिणामी मातीतून होणाऱ्या बाष्पीभवनाचा वेग मंदावतो.

**सीताफळ** : सीताफळाचा हंगाम संपलेल्या बागेमध्ये वाळलेल्या फांद्या व फळे काढून टाकावीत. ताण देण्यासाठी बागेस पाणी देऊ नये. सीताफळ पिकात मिलिबग (पिठ्या ढेकूण) या किडीच्या नियंत्रणासाठी सैल साल खरडून काढून नष्ट करावी. कारण अनुकूल काळात पिठ्या ढेकूण या सालीमागे लपून राहतात. जमिनीत बुंध्यापाशी दाणेदार फोरेट (१० टक्के) १० ग्रॅम प्रतिझाड या प्रमाणात ओलसर मातीत टाकावे.

**पेरु** : पेरु या फळपिकावर प्रामुख्याने मिलिबग (पिठ्या ढेकूण) या किडीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे. त्यांच्या नियंत्रणासाठी ब्युप्रोफेझिन १ मि.लि. प्रतिलिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी.

ज्या बागांमध्ये फळे वाढीच्या किंवा काढणीच्या अवस्थेत आहेत तेथे फळमाशीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे. नियंत्रणासाठी मिथाईल युजेनॉल सापळे प्रतिएकरी २ या प्रमाणात वापरावेत. दर्जेदार व तजेलदार फळांच्या उत्पादनासाठी प्रतिझाड २५ ग्रॅम ट्रायकोडर्मा, २५ ग्रॅम ॲझोटोबॅक्टर, २५ ग्रॅम पी.एस.बी. अशी जिवाणू खते द्यावीत.

**आवळा** : ताण देण्यासाठी बागेस पाणी देऊ नये. आवळ्याच्या झाडावर साल खाणारी अळी, पाने गुंडाळणारी अळी, फळे पोखरणारी अळी आणि शेंड्यावर गादी करणारी अळी अशा किडींचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे. त्याचे नियंत्रण करावे.

नियंत्रण प्रमाण : प्रतिलिटर पाणी डेल्टामेथ्रिन १.५ मि.लि. किंवा क्विनॉलफॉस १.५ मि.लि.

**कागदी लिंबू** : बागेमध्ये ओलावा टिकवून ठेवण्यासाठी आणि मातीतील उपयुक्त जिवाणूंच्या, गांडुळांच्या संख्येत वाढ होण्यासाठी बुंध्याभोवती आच्छादन (५ टन प्रतिहेक्टरी) करावे.

ज्या ठिकाणी नवीन बहार धरावयाचा आहे, तेथे बहर धरण्यापूर्वी ताण देण्यासाठी बागेचे पाणी तोडावे.

कागदी लिंबावर डिंक्या या रोगाचा प्रादुर्भाव होतो. त्याच्या नियंत्रणाच्या उपाययोजना कराव्यात.

**व्यवस्थापन** : प्रथम रोगट फांद्या, पाने, फळे काढून त्यांचा नाश करावा. खोडाला १० टक्के बोर्डोपेस्ट लावावी. डिंक्या झालेल्या भागात थोडे खरडून पेस्ट लावावी. झाडाच्या बुंध्यात पाणी साचून राहिल्यास या रोगाचा प्रादुर्भाव वाढतो. त्यामुळे बुंध्याला मातीची भर द्यावी. तसेच वाफसा स्थिती राहील इतकेच पाणी द्यावे.

आवश्यकता वाटल्यास १ टक्का बोर्डो मिश्रण किंवा मेटॅलॅक्झिल ८ टक्के अधिक मँकोझेब ६४ टक्के संयुक्त बुरशीनाशकाची ३ ग्रॅम प्रतिलिटर पाणी या प्रमाणात झाडाच्या बुंध्याशी आळवणी करावी. मोठ्या झाडाला १०-१५ लिटर तर लहान झाडाला ३-४ लिटर द्रावणाची आळवणी करावी. सद्य:स्थितीत फळांवर रसशोषण करणाऱ्या पतंगांचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे. नियंत्रणासाठी प्रतिएकरी २ प्रकाश सापळ्यांचा वापर करावा. प्रकाश सापळ्यांच्या तळाशी ठेवलेल्या भांड्यात डायमिथोएट किंवा क्लोरोपायरिफॉस २ मि.लि. प्रतिलिटर पाणी या प्रमाणात द्रावण ठेवावे. प्रकाश सापळ्यात पतंग सापडून खालील कीटकनाशकाच्या द्रावणात पडतात, त्यामुळे पतंगांचे चांगल्या प्रमाणात नियंत्रण होते.

**आंबा** : आंबा पीक बहुतांश काढणीच्या किंवा फळवाढीच्या अवस्थेत आहे. अशा वेळी फळमाशीचा प्रादुर्भाव होतो. त्यामुळे प्रतिबंधात्मक उपाय म्हणून मिथाईल युजेनॉल सापळे प्रतिएकरी २ या प्रमाणात वापरावेत.

**बोर** : बोरांचा हंगाम संपलेल्या बागेमध्ये वाळलेल्या फांद्या व फळे काढून टाकावीत. ताण देण्याच्या दृष्टिकोनातून बागेस पाणी देऊ नये. ■